ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

ISSN 2320-6128

# Indian Thinker

International Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Editor In Chief

**Arun B. Godam**

Dec-16-(3)

...CATION SOCIETY'S ...LLEGE, DEGLOOR Dist.Nanded

ISSN 2320 - 0129

# Indian Thinker

International Research Journal [illegible] Higher Education For All Subjects & All Languages

Editor In Chief
Arun B. Godam

Vol I Issue VI, Year III ( Half Yearly) FEB. 2016 to JULY. 2016

**Editorial Office :**

Khadgaon Road, Kapil Nagar, Latur, Dist. Latur 413512 (M.S.) India.

**Contact :-**

Arun B. Godam

8149668999, 8483959442

**E-mail :**

hitechresearch11@gmail.com.

Shaurya Publication,
Latur

Price : Rs. 250/-

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Hanumant Mane**
R Guide & Head, Dept. of Marathi,
Shivchatrapati College,
Kalam, Dist. Osmanabad(M.S.)

**Dr. N.J. Waghmare**
Res. Guide & Head,Dept. of Pali,
Govt. Sanatketar College,
Shivani, (M.P.)

**Dr. U.T. Gaikwad**
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

**Dr U.V.Panchal**
H.O.D, Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Pro. S.B. Karande**
Dept. of Economics,
Shri Bhausaheb Vartak College,
Borivali (W), Dist. Mumbai.

**Dr M.U. Yusuf**
Assistant Professor,
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Auranbadad, Dist. Aurangabad

**DEPUTY EDITORS**

**B.J. Hirve**
Dept. of botany
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed. (M.S.)

**S.M. Bansode**
Dept. of Sociology,
Shri Shiv Shahu Mahavidalaya,
Sarud, Tq, Shahuwadi, Dist. Kolhapur

**Maimanat Jahan Ara**
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr. B.T. Lahane**
Principal, Head, Dept. of English,
Sambhajirao Kendre College,
Jalkot, Dist. Latur (M.S.)

INDIAN THINKER

Half yearly Research Journal

ISSN - 2319- 8648

Vol I Issue VII. Feb. 2016 to July. 2016

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Major Steps of Economic Reforms Taken by Government of India | Dr.Pratap J. Phalphale | 6-12 |
| 2 | Effect Of Conditioning Exercise On The Physical Components Among Sedentary Students | Gangadhar Sarode | 13-17 |
| 3 | Health Status Of Woman's In Gulbarga District | Mr. Shekarraj Tippanna | 18-22 |
| 4 | Isolation of Klebsiella pneumoniae from pus and its antibiogram | Kagne S.R. | 23-28 |
| 5 | Female Feticide: A Social problem in India | Shri. Bansode S. S. | 29-35 |
| 6 | MGNREGA: A Milestone for Women Empowerment | Rajendra Kumar, Dr.Alok Kumar | 36-41 |
| 7 | Childlessness Women In India: A Sociological Observation | Dr.Sanjukumar Minchy | 42-49 |
| 8 | Awareness And Knowledge Of Diversity Issues In India | Dr.Sharanagouda .S .Hiregouda | 50-58 |
| 9 | Problems And Prospect Of Nssk Sugar Industry Workers | Dr. Narasappa Maruti | 59-63 |
| 10 | कबीर : विद्रोह और समाजदर्शन | डॉ. बळीराम संभाजी भुक्तरे | 64-66 |
| 11 | महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता | प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव | 67-74 |

# महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता

ADAT VYAPARI EDUCA... DEGLOOR COLLEGE ... Dist.Nanded

प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय, देगलूर.



## Research Paper - Political Sci.

प्रस्तावना : २१ व्या शतकाच्या दहशतवादी, हिंसाचारी व शस्त्रास्त्राच्या युगात आणि मानवातील ... होत असल्याच्या पार्श्वभूमीवर महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता आजही आहे हे पटवून ... या लेखास शब्दबध्द केले आहे. महात्मा गांधींचे व्यक्तिमत्व आणि कर्तृत्व सर्वश्रुत आहे. एक ... आणि समाजसुधारक अशी प्रतिमा संबंध जगात गांधीची आहे. महात्मा गांधीनी त्यांच्या ... कोणत्याही नव्या तत्वज्ञानाची मांडणी केली नाही. परंतु भारताच्या सांस्कृतिक इतिहासातील ... तत्वज्ञानाचा वारसा मांडवली व साम्राज्यवादी व्यवस्थेत सहज व साध्या पध्दतीने आचरणात आणला. ... तत्वज्ञान आचरणात आणणारा तरुणांचा एक नवा वर्ग पारतंत्र्यात निर्माण केला. ज्यास अभ्यासक ... तत्वज्ञान व गांधीवादी या नावाने संबोधतात.

### ...त्मा गांधी आणि भारतीय संस्कृतीचे पुनर्जीवन :-

महात्मा गांधीच्या संपूर्ण तत्वज्ञानाचा अभ्यास करता हे जाणवते की, त्यांनी भारतातील कांही प्रमुख ...वर आपली श्रध्दा व विश्वास व्यक्त केला. त्या विचारधारांनीच त्यांच्या संपूर्ण तत्वज्ञानाला प्रभावित ... महात्मा गांधीचा जन्म अशा देशात झाला ज्या देशातील जीवन, जगत, सृष्टी आणि निसर्गाच्या मुळात ... अचेतन तत्वज्ञान आहे. जीवनाची निर्मिती आणि जगाची रचना शुभ-अशुभ, जड आणि चैतन्य याला ... झाली. याचा अर्थ असत्यावर सत्याची आणि वाईटावर चांगल्याचा विजय होईल. जगाला आपल्या ...ळ्यास दिसणारा भौतिक अंश जितका सत्य आहे तेवढाच आणि त्यापेक्षाही अधिक सत्य न दिसणारा एक ... भावनाप्रदान भाग आहे. मानवात ज्याप्रमाणे वाईट विचार व भावना आहेत. त्याचप्रमाणे त्याच्यात चांगले विचार व भावना आहेत. जर त्याच्यात पशुत्व असले तर देवत्वही असते. या संपूर्ण सृष्टीचे प्रयोजन हे आहे की, त्यात देवत्वाचे प्रबोधन व्हावे व दानवत्व नष्ट व्हावे शुभकामना जागृत व्हावी आणि वाईटाचा

ISSN - 2319-86
Vol I Issue VII, Feb. 2016 to July, 2016
Degloor College, Degloor

पराभव व्हावा. गांधीच्या मते जे कांही वाईट-असुंदर, अशिव व असत्य आहे ते सर्व अनैतिक आहे. जे शुभ, सत्य, चांगले आहे ते नैतिक आहे. तेच सत्य, शिव आणि सुंदर आहे. जे सुंदर आहे त्याने शिवमय आणि संयमी असावे. मनुष्य प्रारंभापासूनच आपले शरीर, भोग स्वार्थ, अहंकार, पोट आणि प्रियजनांना प्राथमिकता देत असतो.

**महात्मा गांधीची अहिंसा :-**

महात्मा गांधी संपूर्ण सृष्टीकडे पाहण्याचा एक सर्वसमावेशक, त्यागी, उदारतापूर्वक, प्रेमळ व निरस्वार्थ दृष्टीकोन विकसित केला. त्याच पध्दतीने मानवाच्या इतिहासाकडे पाहिले. त्यांचे तत्वज्ञान एक प्रकारे जीवन, मानवी समाज आणि जगाविषयीचे नैतिक भाष्य आहे. यातूनच त्यांच्या अहिंसा तत्वज्ञानाचा उदय झाला. महात्मा गांधीचे अहिंसा तत्वज्ञान प्राचीन काळातील संत आणि महात्म्यांच्या अहिंसा तत्वज्ञानाप्रमाणे नाही. त्यांच्या अहिंसेला शाब्दीक अर्थ आहेत. ते त्यांच्या संपूर्ण तत्वज्ञानाचा सार आहे. जगात जे काही अनैतिक आहे ती हिंसा आहे. स्वार्थ, अहंकार, भोगवादी प्रवृत्ती, शोषण, सार्वभौमत्व आणि अधिकार, स्वकियांचे सुख, वैभव व ऐश्वर्याचे मानकरी समजण्याची प्रवृत्ती त्यांच्या दृष्टीने पशुभावासमान आहे. जे मानवाला पशु, अनैतिक, अमानवीय बनवते. त्यांच्या अहिंसेला फक्त आदर्शवादाचा आयाम नसून ते त्यांचे ध्येय प्राप्तीचे एक शक्तीशाली साधन होते. अहिंसेला पशुतेच्या विरोधात विद्रोहाच्या स्वरुपाने उभे केले. त्यास अजातशत्रु बनवले. अन्याय आणि अनितिसमोर डोके टेकवणे पाप आहे. पशुतेला आश्रय देवू नये त्यासमोर नतमस्तक होवू नये. अन्याय आणि दानवतेचा सामना अनैतिक आणि दानवतेने करु नये. कारण त्यातून मिळणारा विजय दानवतेचा दानवतेवरील विजय असेल. दानवतेवर देवत्वाचा विजय तेंव्हाच होतो जेंव्हा नैतिक आणि शुभ अस्त्रांनी अनैतिक आणि दानवतेच्या भावनेचा पराभव होईल. शस्त्राने शस्त्राला, हिंसेने हिंसेला, क्रोधाने क्रोधाला पराभूत करता येत नाही.

गांधीची अहिंसा निष्क्रिय नसून सक्रिय आहे. ती भित्र्या पलायनवादी आणि शस्त्राने भयभीत होणाऱ्यासाठीचा मार्ग नाही. ती वीरता, दृढता, संकल्प आणि धैर्याला आधार बनवून उभी टाकते. जी अन्याय आणि अनाचाराला जगातील संपूर्ण शस्त्रशक्तीचा आणि द्वेष व दंभाने भरलेल्या दमनात्मक प्रवृत्तीला आव्हान देते. त्यांच्या मते या चिंतनातून असहकार आणि सत्याग्रहाचा जन्म झाला. जे त्यांच्या हिंसक क्रांती, रक्तहीन आणि हिंसाहीन युध्दाचे मूर्त रुप आहे. त्यांच्या दृष्टीने अहिंसा एक परिपूर्ण शक्ती आहे जी कधीच पराभूत होवू शकत नाही. सशस्त्र विद्रोहापेक्षा अधिक ताकत अहिंसक विद्रोहात असते. शस्त्राचा आधार घेवून अहिंसक वीराच्या आत्म्याचे दमन करण्यात सत्ता, साम्राज्य आणि शक्ती समर्थ नसते.

ISSN - 2319-8648
Vol I Issue VII, Feb. 2016 to July. 2016

अहिंसा नैतिकतेवर आधारित आहे. ती सत्य आहे आणि सत्य हे नेहमी विजयी होते. अशाप्रकारे अहिंसेच्या रुपात त्यांनी उज्वल, महान आणि नैतिक मार्ग निर्माण केला, ज्याने मनुष्य समाज आणि गतिशील होण्याची प्रेरणा प्रदान केली. महात्मा गांधीजी त्या संपूर्ण विचाराचे प्रतीक आहेत जे पशुत्वाऐवजी देवत्वाच्या दिशेने पुढे जाण्याचा संकेत देतात. अहिंसेच्या आधारावर मनुष्याचे जीवन आणि जीवनाच्या व्यवस्थेची रचना केली जाते. त्यांच्या मते मनुष्याचे हृदय परिवर्तन करता येते. त्याचा सकारात्मक व सभ्य समाजाचा आहे. निसर्गतः मनुष्य चांगला आहे. त्यांच्या मते व्यक्तिने समाज व्यक्तिचा बदल समाजाला परिवर्तित करतो. परिवर्तित समाज व्यक्तिसाठी नूतन संस्कृतिचा उदय तो. आर्थिक व्यवस्थेचा व्यक्ति आणि समाजावर अधिक प्रभाव पडतो. या प्रभावातून निर्माण होणाऱ्या र्थिक आणि सामाजिक क्रिया-प्रतिक्रिया राजकीय व्यवस्थेला जन्म देतात. वर्तमानात उत्पादनांची प्रणाली त्रिक यंत्रामुळे केंद्रीत झाली. गांधीच्या मते हेच जगातील संपुर्ण समस्यांचे मूळ आहे. उत्पादनाची केंद्रीत गाली केंद्रीय भांडवलवादाला जन्म देते. ज्यामुळे समाजातील मोजक्याच व्यक्तिच्या हातात आर्थिक आणि माजिक व्यवस्थेची सुत्र जातात. त्याच्या रक्षणासाठी शक्ती, अधिकार आणि सार्वभौमाला केंद्रीत करण्यासाठी स्त्रशक्तीच्या आधारावर राजकीय सत्ता मजबूत होते. परिणामतः समाजातील मोठ्या भागाचे शोषण आणि न होते. अशाप्रकारे अधिकाराने वंचित आणि शोषीत समाज आर्थिक, सामाजिक, राजकीय दृष्ट्या पारतंत्र्य नतो. परंतू तो वरकरणी स्वतंत्र वाटतो. शस्त्र आणि मानवाकडून मानवाचे शोषण होते. या समस्येवर उपाय हिंसक समाजाची स्थापना आहे. या समाजाची रचना विकेंद्रीकरणाच्या आधारावर केली जाते. उत्पादन णाली विकेंद्रीत असावी. उत्पादनाचे साधन विकेंद्रीत असावे. भांडवल विकेंद्रीत असावे. समाज जीवन गण्यासाठी आवश्यक पदार्थांच्या उपलब्धीबाबत स्वावलंबी असावा. त्याला कोणावरही अवलंबून राहण्याची ळ येवू नये. आपल्या उत्पन्नाचा उपभोग स्वतः घेता यावा. अशाप्रकारे विकेंद्रीत उत्पादन आणि भांडवलाच्या आधारावर बनलेला समाज कोणत्याही वर्गाच्या स्वार्थाचे साधन बनू नये. जेंव्हा भांडवल विकेंद्रीत बनेल आणि समाजातील सर्व घटक व संस्था स्वावलंबी बनतील तेंव्हा शस्त्रशक्तीने संपन्न केंद्रीय राजकीय सत्तेची आवश्यकता पडणार नाही. मनुष्य आपल्या स्वातंत्र्याचा खरा उपभोग करुन इतरांचे शोषण व दमन करु नये. गांधीचा चरखा स्वातंत्र्य आणि विकेंद्रीकरणाच्या सिध्दांताचे प्रतीक आहे. तसेच तो अंहिसक समाजाच्या निर्मितीसोबत आहे. त्याने आधुनिक जगातील समाज व्यवस्था, मान्यता व धारणांना आव्हान दिले.

**साध्य आणि साधन :-**

... दिला. साध्य पवित्र आणि मानवीय असेल तर

ADAT... EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

ISSN - 2319-8648
ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist. Nanded *

साधन ही तितकेच शुध्द, योग्य व मानवीय असावे. त्यांच्या या विचाराने मानवी समाजाच्या विकास इतिहासात एक अत्यंत उज्वल आणि पवित्र अध्यायाची निर्मिती केली. महात्मा गांधीत मानवतेच्या विकासासाठी आवश्यक आदर्शांचा संगम आहे, त्यांच्यात श्रीरामाची मर्यादा, श्रीकृष्णाची अनासक्ति, महात्मा गौतम बुध्दांची करुणा, ईसाचे प्रेम आणि महात्मा बसवेश्वरांची कायकनिष्ठा यांचा एकत्रित संगम आहे. श्रेष्ठ, आदर्श, धर्म आणि नैतिकता, प्राणिमात्राचे कल्याण यांच्या आधारे जीवनमार्गक्रमण करणाऱ्या महापुरुषांच्या संपूर्ण विचारांचा समावेश महात्मा गांधीच्या तत्वज्ञानात आहे. महात्मा गांधीच्या सर्वोदय समाजाच्या स्थापने अंतर्गत श्रमाचे महत्व आहे. पैसाऐवजी प्रेम आणि सहकार्याची भावना आहे. घृणा आणि प्रथकता नसून शोषणा ऐवजी परहित आणि संग्रहाच्या प्रवृत्तीऐवजी त्यागाची वृत्ती आहे. वर्तमानात शोषण, स्वार्थ, घृणेमुळे मारामारी, विनाश आणि मानवतेचा ऱ्हास होत आहे. यामुळे महात्मा गांधीच्या सर्वोदयी समाजाची स्थापना करणे आज आवश्यक बनले. गांधीनी धर्माधिष्ठित शिक्षणाचा बहिष्कार केला. कारण त्यांना भिती होती की, ज्या धर्मांचे आचरण आणि शिक्षण दिले जाते ते समन्वय व सहकार्याऐवजी भांडणे निर्माण करते. वर्तमानातील स्थिती पाहता ते योग्य वाटते. मतभेद, बेकारी, वाढती महागाई आणि तणावपूर्ण वातावरणात आज महात्मा गांधीच्या सत्य व अहिंसेवर आधारीत तत्वज्ञान आणि विचारांची उपयुक्तता आवश्यक वाटते. गांधीवादाचा विरोध करणाऱ्यात दुर्भाग्याने इतर कोणत्याही देशाचे लोक नसून अधिकतर भारतीयच आहेत. या विरोधकांना गांधी जीवंत असतांना त्यांच्या विचारांची उपयुक्तता वाटली नाही. गांधीप्रती वाटणाऱ्या या असहकार्यानेच त्यांची हत्या केली. परंतु गांधी विचाराप्रती असहकार्य करणाऱ्यांना हे माहित झाले की, गांधी आपल्या विरोधकांना जिवंतपणी हानीकारक नव्हते जेवढे त्यांच्या हत्येनंतर हानिकारक सिध्द झाले. यामुळेच जस जसे जगात हिंसा, आर्थिक मंदी, भूख, बेकारी आणि घृणेने संपूर्ण परिस्थिती बिघडली तस तसे जगाला गांधी तत्वज्ञानाची आठवण होत आहे. याहीपूढे गांधी तत्वज्ञानाला आत्मसात करण्याची आवश्यकता वाटत आहे.

महात्मा गांधीच्या तत्वज्ञानाची प्रासंगिकता आहे हे वर्तमानातील आणि गांधीनंतरच्या इतिहासातील कांही घटनाक्रमावर नजर टाकता सिध्द होते. दहशवादा विरुध्दच्या भयानक युध्दातून होणारी जीवित हानी, अरबो रुपयांचा खर्च, प्रामाणिक लोकांची हत्या आणि अमेरिका व त्यांच्या सहयोगी देशातील सैनिकांचा मृत्यु आणि वाढती मंदी, बेकारी व मानवाधिकारांचे होणाऱ्या हणनामुळे वाढता असंतोष, अमेरिकेकडून दहशतवादाच्या विरुध्द आक्रमक धोरणांचे समर्थन, बराक ओबामांकडून महात्मा गांधीच्या सत्य, अहिंसा व शांततेच्या मार्गाने

ISSN - 2319- 8648
Vol 1 Issue VII, Feb. 2016 to July, 2016
ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

अमेरिकेच्या राजकारणात अचानक झालेला हा बदल दहशतवादास विरोध करुन सत्य, अहिंसा व ...चा पुरस्कार करणाऱ्या गांधीवादी तत्वज्ञानाचा विजय आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील वाढत्या हिंसापूर्ण ...रणात महात्मा गांधीच्या आदर्शाची प्रासंगिकता सिध्द होते. सर्वधर्मसमभावाचे तत्वज्ञान सांगणारे गांधीचे ...त्मत्व आदर्शवादी होते. त्यांनी अनेक धर्म व संप्रदायाचा इतिहास व धर्मग्रंथाचा अभ्यास केला. गीतेच्या अभ्यासाने गांधीनी कर्मावर आधारित धर्मसिध्दांतावर चालण्याची प्रेरणा मिळाली. या प्रेरणेतूनच त्यांनी सर्वधर्मसमभावाने प्रेरित होवून भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे नेतृत्व केले. त्यासपूरक अनेक सत्याग्रह केले. भारताला एक सफल व यशस्वी राष्ट्र बनवण्यासाठी सर्वधर्म समभावाच्या तत्वज्ञानाचा आधार घ्यावा लागेल.

महात्मा गांधी अहिंसेचे पूजारी होते. त्यामुळे त्यांनी कोणत्याही स्तरावर होणाऱ्या हिंसेला कोणत्याही समस्येचे पूर्ण व स्थाई समाधान मानले आहे. वर्तमानात दहशतवाद व हिंसा जागतिक पटलावर वाढली, तसे संपूर्ण जगात गांधीच्या आदर्शाची प्रासंगिकता यावरील चर्चा वाढत आहे. १९१४ ते १९१८ या पहिला व १९३४ ते १९४५ या दुसऱ्या महायुध्दा दरम्यान गांधींनी अहिंसेचे तत्वज्ञान यशस्वी केले. अहिंसा परमो धर्मच्या तत्वज्ञानाचा प्रसार व प्रचार करत होते. गांधीनी शास्त्राविरुध्द शस्त्राचा प्रयोग करण्याऐवजी शस्त्राविरुध्द युध्द करण्याची एक मानवतावादी पध्दती समाजाला दिली. ज्यात कोणालाही आपला शत्रू बनवण्याची गरज पडत नाही. तसेच शस्त्र उचलण्याची आवश्यकता नाही ते समाजाला आपल्या विचाराशी सहमत बनवणे आणि त्यांचे हृदय परिवर्तन करण्यात विश्वास ठेवतात. दूसऱ्या महायुध्दात झालेल्या भयंकर नुकसानीनंतर जेंव्हा युध्दाने कांही उपाय साधला नाही तेंव्हा संयुक्त राष्ट्र संघटनेने १९४५ ला महात्मा गांधीजींच्या सिध्दांतानुरुप युध्द कोणत्याही समस्येचे समाधान नाही अशी घोषणा केली. शेवटी चर्चेनेच सर्व समस्या सोडवाव्यात यास प्रमाण मानले.

**महात्मा गांधीचे उद्योग व खेड्याविषयीचे विचार :-**

आज संपूर्ण जग आर्थिक मंदीच्या सावटाखाली आहे. महात्मा गांधीजी मोठ्या उद्योगाचे विरोधक होते. वाढत्या उद्योगवादाप्रती अधिक चिंताग्रस्त होते. उद्योगवादी व्यवस्थेला त्यांनी राक्षसी व्यवस्थेचे नाव दिले. उद्योगवादी भारतासारख्या विशाल लोकसंख्या व भूभाग असणाऱ्या विकसनशील देशात वाढती बेकारी आणि मोठ्या व आधुनिक उद्योगाच्या विकासाने महात्मा गांधीच्या विचारांची उपयुक्तता सिध्द केली. लघु उद्योगाचे समर्थन काही विशिष्ट कारणांमुळे गांधीनी केले. गांधीजी सदैव गरीबांच्या हिताचा विचार करत. समाजात परिवर्तन, विकास, प्रगती व सामाजिक क्रांतीसाठी गरीबांना अन्न, वस्त्र, निवारा मिळणे गरजेचे

विचार करु शकत नाही. महात्मा गांधीचा जन्म एका समृध्द घरात झालेला होता. ते व्यवसायाने वकील होते. त्यांना वकिली व्यवसायातून चांगले उत्पन्न मिळत होते. तरीही गांधीच्या मनात समाजातील अन्यायाविरुध्द संघर्ष चालू करण्याचा विचार येत होता. त्यामुळे त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील रंगभेदाला समाप्त करण्यासाठी आवाज उठवला ज्याचा शेवट भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात आला. महात्मा गांधीनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करण्यापूर्वी संपूर्ण भारत पादाक्रांत केला. तेंव्हा त्यांना भारतातील गरीबी व भूकबळींचे दर्शन झाले. ज्यातून गांधीच्या अंगावरील कोट, पँट, सुट, नाहीसा होवून एक धोती व पंचा अंगावर टाकणारा हाडामांसाचा एक महात्मा उभा झाला.

खरा भारत हा खेड्यातच आहे. त्यामुळे जोपर्यंत खेडी विकसित होत नाहीत तोपर्यंत देशात वास्तविक विकासाची कल्पना शक्य नाही. स्वातंत्र्य प्राप्त केल्यानंतर गांधींनी पंडीत नेहरुंना म्हटले की, आता देशातील खेड्याकडे लक्ष द्या. देशाचा आर्थिक आधार मजबूत करण्यासाठी खेड्यांना तयार करा. म्हणजेच ग्रामीण अर्थव्यवस्था समृध्द करा. स्वातंत्र्यानंतरच्या सत्ताधाऱ्यांनी गांधीच्या या विचारांना किती महत्त्व दिले हा वेगळा विषय आहे. वर्तमान मोदी शासन महात्मा गांधीच्या विचारावर आधारलेले खेडे उभे करण्यासाठी आदर्श ग्राम सांसद योजना व खेड्यांना विजमुक्त करण्याचा संकल्प केला. भारतातील खेडी समृध्द कशी होतील या दिशेने वर्तमान केंद्र व राज्य शासन अनेक योजना बनवत आहे. यावरुनही हे लक्षात येते की, गांधीच्या खेड्यांना समृध्द करण्याचा विचार किती प्रासंगिक आहे.

**महात्मा गांधी आणि शिक्षण :-**

महात्मा गांधीनी शिक्षण विषयक विचार मांडताना लहान मुलांना शिक्षणाच्या माध्यमातून आत्मनिर्भर बनवण्यासाठीचा विचार मांडला. त्यासाठी त्यांनी श्रमदानाचा आग्रह केला. शालेय व महाविद्यालयीन जीवनात एन.एस.एस., एन.सी.सी. व इतर उपक्रमांतून शारिरीक श्रम करण्यावर भर दिला जातो. कारण मुले आत्मनिर्भर बनावीत, श्रमदान शिकावे, मेहनत करण्यापासून दूर जावू नयेत. गरज पडल्यास स्वतः शेती करावी, पुल, बांध, तलाव, रस्ते इत्यादींची निर्मिती श्रमदानातून व्हावी. परंतू वर्तमानात श्रमदानाची संकल्पना जवळपास लुप्त झाली. संगणकधिष्ठित शिक्षण प्रणालीत श्रम बॅकफुटवर गेले. आधुनिक शिक्षण प्रणालीत शिकणारा विद्यार्थी शारिरीकदृष्ट्या निश्चितच आळशी बनत आहे. माऊसच्या साह्याने संपूर्ण जगाला आपल्या कवेत घेवू पाहणारा विद्यार्थी आपल्या आजूबाजूच्या जगापासून दुर जात आहे. श्रमदान करण्याच्या मानसिकतेचा

[illegible] आदर्श घेवून

ISSN - 2319- 8648
Vol I Issue VII, Feb. 2016 to July. 2016

...माध्यमांनाही गांधीच्या या विचाराकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळेच प्रसार माध्यमातून श्रमदानातून ...होणाऱ्या लोकांना कॅव्हातरी प्रसारित केले जाते. तसेच जर श्रमदानातून स्वच्छता व राष्ट्र विकासात योगदान देत असेल तर त्याबाबत व्यंगात्मक टिप्पणी व लिखाण केले जाते. वर्तमानात शारिरीक श्रम ...गरीब व कनिष्ठ असे समीकरण बनले. तसेच श्रमदानाकडे सामाजिक व राजकीय प्रतिष्ठा ...चे एक माध्यम म्हणून पाहिले जाते. नरेंद्र मोदी शासनाने स्वच्छता अभियानास दिलेल्या प्राधान्याने श्रमदानाचे महत्व कांही प्रमाणात वाढले. श्रमदान हे राष्ट्रीय कार्य आहे असा विचार मांडला जावू ...महाराष्ट्र शासनाने वाढत्या पाणी समस्येपासून सुटकारा मिळवण्यासाठी श्रमसिध्दांतावर आधारित ...युक्त शिवार अभियानाची चळवळ राववली ज्यात राज्यातील अनेक मंत्री, वरिष्ठ अधिकारी, पत्रकार, ...जिक कार्यकर्ते, विविध सामाजिक संघटना आणि सर्व संस्थांनी सहभाग घेतला. या योजनेमुळे अनेक ..., तलावाचे खोदकाम करण्यात आले. पूर्णतः लुप्त झालेल्य नदीचे पूनर्जीवन करण्यात आले. या योजनेत ...च्या योगदानासह शासकीय यंत्रणेनेही सहभाग दिला. यामुळे संबंध महाराष्ट्र व भारतातील जनतेला ...त्मा गांधीच्या श्रमदानाची आठवण झाली.

...र्ष :-

महात्मा गांधीच्या सिध्दांत, तत्वज्ञान आणि मानवतावादी विचारांची अहवेलना भारतातील सांप्रदायिक ...घटना व समूहांकडून अधिक केली जाते. स्वतंत्र भारतात सर्वांत प्रथम व सर्वांत महत्वपूर्ण राजकीय व्यक्ती ...म्हणून ओळखणाऱ्या महात्मा गांधींची हत्या सर्वांत प्रथम झाली. हिंदू, मुस्लीम, शिख, ख्रिश्चन इत्यादी सर्व ...समुदायांकडे समानदृष्टीने पाहणारे गांधीजी सत्ता आणि बहुमताला केंद्रबिंदू मानुन कोणता निर्णय घेत नव्हते. ...शांतता, प्रेम, सद्भावना, सत्य व अहिंसा, मानवता सर्व धर्मसमभाव त्यांच्या तत्वज्ञान विचारांचा मुख्य अंश ...होते. परंतू सांप्रदायिकतेच्या राजकारण्यांना महात्मा गांधीचे सर्वधर्मसभावाचे धोरण आवडले नाही. त्यामुळेच ...यांनी हत्या करण्यात आली, परंतू मृत्युनंतरही महात्मा गांधीचे विचार मोठ्या प्रमाणात जगाने डोक्यावर ...घेतले. संपूर्ण जगभर महात्मा गांधीच्या विचारांना मानणारा वर्ग सर्वच क्षेत्रात आहे. त्यांच्या विचारांपूढे नतमस्तक होणाऱ्यांची संख्या वाढत आहे. हिंसेला जेंव्हा जेंव्हा अहिंसेच्या साधनाने उत्तर देण्याचा प्रयत्न होईल ...तेंव्हा तेंव्हा आम्हाला गांधीवादाची आठवण येईल. महात्मा गांधीचे विचार, तत्वज्ञान, सिध्दांत, उपक्रम पूर्वीही प्रासंगिक होते, आजही आहेत. हे विश्व असेपर्यंत नेहमी प्रासंगिक राहतील. कारण गांधी तत्वज्ञान मानवाचे ...जीवन ...रीने व मानसिकरित्या कसे सुखकर करता येईल याचा शाश्वत विचार करणारे आहे.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

ISSN - 2319-...
Vol I Issue VII, Feb. 201...

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

## संदर्भ सूची

१) मूल्यव्यवस्था गांधी विचार-संपादक डॉ.पंजाब चव्हाण, निर्मल प्रकाशन, नांदेड-२०१०.
२) गांधी, नेहरु आंबेडकर-सामाजिक न्याय एवं राजनीति, कान्ता मीना, हेमराज मीना-आदि पब्लिकेशन जयपूर-२०११
३) गांधी, नेहरु, आंबेडकर-सामाजिक न्याय-डॉ.बबीता वर्मा-आविष्कार पब्लिशर्स, डिस्ट्रीब्युटर्स, जय... २०१२.
४) महात्मा गांधी प्रणित इतिहासशास्त्र आणि हिंद स्वराज्य : अन्वयार्थ-फकरुद्दीन बेन्नूर-गांधी अ... केंद्र शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
५) गांधीजींचे असामान्य नेतृत्व-पास्कल ॲलन नाझरेथ अनुवाद-सुजाता गोडबोले-राजहंस प्रका... पुणे-२०१४.
६) महात्मा गांधी आणि भारतीय राज्यघटना-नरेंद्र चपळगावकर-राजहंस प्रकाशन, प्रा.लि.पुणे-२...
७) भारत में लोकतांत्रिक विकेंद्रीकरण और नवपंचायतीराज डॉ.राजकुमारी सुराणा-राज पब्लि... हाऊस-जयपूर- २०००.
८) Gandhi and his critics - B.R. Nanda-Oxford University, Press Delhi-198...
९) अखंड प्रेरणा गांधीवादाची संपादन-रघुनाथ माशेलकर-सकाळ प्रकाशन, पुणे-२०११.
१०) विलड्युरांट हिंदूस्थानची कैफियत-अनुवाद-कल्याण वर्दे-२०१३.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded